**४० रस्त्यांच्या ४१७ कोटी रुपयांच्या कामांचे भूमिपूजन एकाच दिवसात**

**कल्याण डोंबिवली भागातील रस्त्यांचा होणार कायापालट**

**मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आणि श्री श्रीकांत शिंदे, मा. खासदार यांच्या उपस्थितीत कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या कामांचा भूमिपूजन सोहळा**

**१३ नोव्हेंबर, २०२२:**

**कल्याण डोंबिवली च्या नागरिकांना मिळणार उच्च दर्जाचे काँक्रिट रस्ते**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत डोंबिवली एमआयडीसी निवासी भागातील रस्त्यांचे रुंदीकरण व सुधारीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या प्रकल्पांतर्गत मिलाप नगर निवासी क्षेत्रातील काँक्रीट रस्ता, सुदामा नगर निवासी क्षेत्रातील काँक्रीट रस्ता, सुदर्शन नगर निवासी क्षेत्रातील काँक्रीट रस्ता यांचा समावेश असेल. रस्त्यांचे रुंदीकरण आणि मजबुतीकरणासोबतच चेंबर्स युटिलिटी डक्ट्स, सध्याच्या बॉक्स कल्व्हर्टच्या ऐवजी नवीन आरसीसी बॉक्स कल्व्हर्ट बांधकाम व विस्तार, पर्जन्य जलवाहिनी, फूटपाथ इत्यादींचा समावेश आहे.

गजानन चौक ते नांदीवली नाला रस्त्यावर समर्थ चौक, रामकृष्ण बाजार परिसरात पावसाळ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. यावर उपाय म्हणून ५मीटर रुंद X ३०० मीटर लांबीचा Box नाला बनवणार आहे. त्यामुळे भविष्यात या भागात पावसाळ्या दरम्यान पाणी साचणार नाही. तसेच सदर नाला हा रस्त्याचा खालून जात असल्यामुळे वाहतुकीवर याचा परिणाम होणार नाही आणि वाहतूक सुद्धा सुरळीत होईल(समाप्त).

"मुंबई महानगर क्षेत्रात रस्ते विकासकामांना आम्ही प्राधान्य दिलं आहे, कारण चांगल्या रस्त्यांमुळेच शहरांचा विकास होतो. त्याअंतर्गत नागरिकांना चांगले रस्ते देण्याचा आमचा प्रयत्न आहे. एमएमआरडीएमार्फत हाती घेण्यात आलेला एमटीएचएल प्रकल्प हा आधुनिक तंत्रज्ञान वापरून उभारण्यात येत, त्यामुळे हा प्रकल्प लवकर पूर्ण होणार असून तो गेम चेंजर ठरणार आहे," अस भूमिपूजन कार्यक्रमा दरम्यान मा. मुख्यमंत्री नागरिकांना संबोधित करताना म्हणाले.

"आज  ४४५ कोटी च्या रस्त्यांचे भुमिपूजन करून कल्याण डोंबिवली शहराच्या विकासाची ही एक नवी सुरुवात झाली आहे. ऐरोली काटाई नाका प्रकल्पाच्या पहील्या टप्प्याचे काम पूर्ण करून लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल, ज्यामुळे अगदी कमी वेळात नागरिकांना नवी मुंबईत पोहोचता येईल" असे श्री श्रीकांत शिंदे, मा. खासदार म्हणाले. "एमएमआरडीए च्या वतीने हाती घेण्यात आलेल्या या कामांमार्फत चांगल्या दर्जाचे रस्ते नागरिकांना वेळेत पूर्ण करून देण्याचा आमचा मानस आहे,"श्री एस. व्ही. आर. श्रीनिवास भा.प्र.से. महानगर आयुक्त म्हणाले.






Being Mahesh sir
Metro